# मॉडर्न हायस्कूलमध्ये जीवनमूल्यांचे धडे

पुणे, ता. १८ : शिवाजीनगर येथील मॉडर्न हायस्कूल (मुलांचे) येथे नुकताच 'जीवनमूल्य' प्रकल्पाचा भाग म्हणून 'पोलिस संवाद' हा कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी विद्यार्थ्यांनी पोलिस निरीक्षक शिंदे यांच्याशी संवाद साधला. छेडछाड, पॉक्सो कायदा, सायबर गुन्हे यांसंदर्भात विद्यार्थ्यांनी पोलिसांकडून मार्गदर्शन घेतले. पंख संस्था आणि व्हिकहिल फाउंडेशन यांच्या वतीने जीवनमूल्य शिक्षण हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. या वेळी संस्थेच्या स्मिता आपटे, कल्याणी भाबड, मुख्याध्यापिका संगीता लकारे, उपमुख्याध्यापिका रोहिणी काळे आणि सीमा कुलधरण उपस्थित होते.